क्रमांक :- एमआयएस-०६१६/सीआर-७५/२०१६/तीन दिनांक :- ७ जुलै, २०१७.

# घोषणा

**विषय:- आयोगामार्फत आयोजित परीक्षांना वेळेपूर्वी उपस्थितीबाबत.**

आयोगामार्फत आयोजित परीक्षांचे संवेदनशील स्वरुप लक्षात घेवून, परीक्षा कक्षामध्ये विहित केलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जात नाही.

२. आयोगामार्फत आयोजित परीक्षा या सर्वसाधारणपणे शहरी भागात घेतल्या जातात. काही वेळा शहरी भागातील मोर्चे, आंदोलने, वाहतूक व्यवस्था विस्कळित होणे, अतिवृष्टी, सार्वजनिक वाहतुकीचा खोळंबा इत्यादी बाबी लक्षात घेवून, परीक्षेच्या दिवसासाठी प्रवासाच्या कालावधीचे पूर्व नियोजन उमेदवारांनी स्वत:हून करणे व कोणत्याही परिस्थितीत विहित वेळेपूर्वी पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. यासंदर्भातील विलंबाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी आयोगाची राहणार नाही अथवा विहित वेळेनंतर उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

ठिकाण :- मुंबई

(सुनिल अवताडे)
उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.